# ECHO OF HIS CALL

ECHO OF HIS CALL
REACHING NATIONS
SINCE 1969
1969 TO 2029

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 OCTOBER | No. 09

## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**स्तोत्रसंहिता २९:१-९**

१. अहो समर्थांच्या मुलांनो, यहोवाला महिमा आणि सामर्थ्य आहेत, असे म्हणा, यहोवाला आहेत, असे म्हणा;

२. यहोवाला त्याच्या नावाला योग्य ते गौरव द्या; पवित्रतेच्या शोभेत यहोवाचे भजन करा.

३. यहोवाचा शब्द जलांवर आहे; गौरवाचा देव गर्जत आहे; यहोवा बहुत जलांवर आहे.

४. यहोवाचा शब्द बलिष्ठ आहे; यहोवाचा शब्द महिमापूर्ण आहे.

५. यहोवाचा शब्द गंधसरु फोडतो, होय, यहोवा लबानोनाचे गंधसरु मोडून त्यांचे तुकडे करतो.

६. आणि तो त्यांना वासराप्रमाणे, लबानोन व शिर्योन त्यांना तरुण रानबैलाप्रमाणे बागडायला लावतो.

७. यहोवाचा शब्द अग्नीचे जाळ विभागतो.

८. यहोवाचा शब्द रान कंपित करतो; यहोवा कादेशाचे रान कंपित करतो.

९. यहोवाचा शब्द हरिणींना प्रसवायला लावतो व वने बोडकी करतो; आणि त्याच्या मंदिरातील सर्व काही म्हणते, त्याचा महिमा होवो.

## तुमच्या आशीर्वादित भविष्यातील सात रहस्ये

SEVEN SECRETS of your blessed future!!

*- सिस्टर एंजल*



आपला प्रभू व तारणहार येशू ख्रिस्त याच्या नावाने शुभेच्छा.

**एको ऑफ हिज कॉल** या मासिकाच्या माध्यमातून दर महिन्याला तुम्हाला भेटून मला मोठा आनंद होतो. देवाच्या कृपेने तुम्ही उत्तम असाल अशी माझी आशा आणि खात्री आहे. आपल्यापैकी काही जणांना आत्ताच्या क्षणी उत्तम वाटत नसेलही; तरीसुद्धा तुम्ही हे मासिक वाचण्यासाठी हातात घेतले आहे ही गोष्ट स्वतःमध्येच विश्वासाचे पुढे पडलेले एक पाऊल आहे. लक्षात ठेवा, देव अजूनही सर्वकाही नियंत्रणात ठेवतो. जोपर्यंत देव स्वतः म्हणत नाही की, आता संपले आहे, तोपर्यंत काहीही संपलेले नसते.

गेल्या काही आठवड्यांपासून तू आपणाला सांभाळ ही वाक्यरचना सतत माझ्या मनात येत आहे. मी यावर अभ्यास करायला आणि मनन करायला सुरुवात केली, आणि म्हणून त्यातील काही विचार तुमच्याबरोबर सामायिक करावे अशी माझी इच्छा आहे.

पवित्र शास्त्र आपणाला सांभाळ अशी शिकवण देते. सांभाळ म्हणजे संरक्षण करणे, जागरुक राहणे, सावध राहणे आणि आपल्या आजूबाजूला काय घडत आहे याची जाणीव ठेवणे होय. आपण स्वतःला सांभाळले पाहिजे अशा काही महत्त्वाच्या बाबींवर नजर टाकूया.

(...पान ३ वर)



एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत
सहभागी होण्याची संधी
पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून
रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

❊ कृपा करुन सब्क्राईब करा ❊

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1969

1969 TO 2029

# ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**HON. EDITOR-IN-CHIEF**

Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

**EX MANAGING EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**GENERAL MANAGER**

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.

**ADMINISTRATION**

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

**EDITORIAL BOARD**

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.



**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

**E.MAIL**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


> ''.....कारण माझ्या मुखाचे तारण आणि माझा देव, त्याची अजून मी स्तुती करीन''- स्तोत्र ४२:११.

प्रभूमधील माझ्या प्रिय मित्रांनो,

आपला तारणारा आणि प्रभू येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावात आपल्याला सदिच्छा!

हे खरे आहे की, देव आपल्याला अनेकदा कठीण परिस्थितींमधून जाऊ देतो, जेणेकरून आपल्या चारित्र्याचे शुद्धीकरण व्हावे आणि आपण त्याच्याजवळ अधिक जवळ जावे. स्तोत्रसंहिता ४२ मध्ये आपण दावीदाला अशा एका काळातून जाताना पाहतो. तो पर्वतांपासून दऱ्यांपर्यंत, वाळवंटापासून नदीकाठापर्यंत जड अंतःकरणाने आणि शांतीसाठी आत्मिक झुंज देत भटकत होता. तरीदेखील, या सर्वांच्या मध्यभागी त्याने आपल्या आत्म्याला देवावर अधिक गाढ विश्वास ठेवण्यास प्रोत्साहित केले.

अधिक गाढ विश्वास ठेवणे, म्हणजे दुःखात देवाची स्तुती करणे, गोंधळलेल्या अवस्थेत त्याच्यावर विश्वास ठेवणे, संघर्षांच्या काळात त्याच्यात आनंद मानणे आणि सर्वात भीषण परिस्थितीमध्ये सुद्धा त्याच्या सत्याला घट्ट धरून ठेवणे होय. याचा मला वैयक्तिक अनुभव आहे, आणि माझा विश्वास आहे की, प्रभू या माध्यमातून तुमच्यामध्ये कार्य करील.

जर आशा मूळ असेल, तर स्तुती हे फळ आहे. स्तुती आणि आराधना आपल्या विश्वासाची मुळे खोलवर रुजवतात. म्हणून जर तुम्ही निराशेचा सामना करीत असाल, तर निराश होऊ नका व आशा सोडू नका! स्थिर राहा!! धैर्य धरा!!! **आपली संपूर्ण आशा देवावर ठेवा.** आपण विचारू शकता, पण मी देवावर कशी आशा ठेवू? माझे उत्तर सोपे आहे: जे दावीदाने केले तेच करा.

''त्याची अजून मी स्तुती करीन.'' आजारपणात त्याची स्तुती करा. अत्यंत आर्थिक ताण तणावांचा सामना करीत असतानाही कृतज्ञतेने त्याची स्तुती करा. तो तुम्हाला लज्जित होऊ देणार नाही. सर्व काही सुरळीत चालत असताना उपासना करणे सोपे असते - ते म्हणजे कृतज्ञता. पण जेव्हा सर्व काही आपल्या विरोधात असते तेव्हा देवाची उपासना करणे हे दृढ आशेचे खरे चिन्ह आहे. अशा विश्वासाने देवाला आनंद होतो.

दावीदाच्या आयुष्यात हे खरे होते. देवाने त्याच्या शत्रूंचा पाडाव केला आणि त्याने जे गमावले होते ते सर्व पुन्हा परत मिळवून दिले. ईयोबाच्या बाबतीतही असेच घडले. ईयोबाने सर्व काही गमावले, तरीही शेवटी देवाने त्याला दुप्पट आशीर्वाद दिला. पवित्र वचन असे सांगते की, ''.........**आणि यहोवाने ईयोबाला मान्य केले**'' (ईयोब ४२:९). तामिळ भाषेतील पवित्र शास्त्राच्या भाषांतरात म्हटले आहे की, ''**देवाने ईयोबाच्या चेहऱ्याकडे पाहिले!**'' किती आशीर्वादित अनुभव आहे हा! त्याचप्रमाणे, देव तुमची काळजी घेईल. त्याच्यावर तुम्ही आपली आशा ठेवा, त्याच्या चांगुलपणाचा तुम्ही अनुभव घ्याल.

देव आपल्या सेवेला भरभरून आशीर्वाद देत आहे. खरंच, ''**यहोवा माझा मेंढपाळ आहे, मला काही उणे पडणार नाही** ''- स्तोत्र २३:१. मला विश्वास आहे की, या महिन्यात प्रभू त्याच्या कृपेने आपल्याला अभिषेक करील व आपण आत्मविश्वासाने घोषणा करू शकू: कमतरता असलेल्यांपैकी मी राहणार नाही.

**एको ऑफ हिज कॉलच्या** सेवाकार्यांसाठी कृपया सतत प्रार्थना करीत रहा आणि प्रभू तुम्हाला सक्षम करीत असताना तुमच्या मदतीने आणि सहकार्याने आम्हाला पाठिंबा देत राहा.

प्रभू तुम्हाला त्याच्या संपत्तीनुरूप आशीर्वादित करो!

येशू ख्रिस्तातील तुमचा सेवक,

पास्टर एस्. सॅम सेल्व राज, E.mail : sam@echoofhiscall.org

(पान १ वरून...)

## १. आपल्या हृदयाचे रक्षण कर!

**''ज्या कशाचे तू रक्षण करतोस त्या सर्वांपेक्षा अधिक कसोशीने तू आपल्या हृदयाचे रक्षण कर,.....''** – नीतिसूत्रे ४:२३.

हिब्रू भाषेत हृदयासाठीचा शब्द 'लेब' आहे. हा शब्द आपल्या भावना, विचार आणि संवेदना यांचे केंद्रबिंदू दर्शवतो. हा असा केंद्रबिंदू आहे जिथून आपण विचार करतो, तर्क करतो आणि निर्णय घेतो. म्हणूनच पवित्र शास्त्र आपल्या हृदयाचे रक्षण करण्यावर भर देते, कारण आपल्या हृदयाची स्थिती आपल्या संपूर्ण जीवनाची दिशा ठरवते.

आपण कोण आहोत हे आपले हृदय ठरवते. ते आपल्या अस्तित्वातील सर्वात गुंतागुंतीचे अवयव आहे; समजायला कठीण आणि अनेकदा आपल्या आकलनाच्या पलीकडचे. म्हणूनच दावीद प्रार्थना करतो, ''हे यहोवा, तू मला शोधले आहे आणि ओळखले आहे,'' कारण हृदय गुंतागुंतीचे, फसवे आणि चंचल असू शकते. फक्त निर्माणकर्ताच खऱ्या अर्थाने त्याची छाननी करू शकतो, त्यातील लपलेली दुष्टता उघड करू शकतो आणि त्याला शुद्ध करू शकतो.

देव आपल्या हृदयातील पापीपणाच पाहत नाही, तर त्यामध्ये दडलेल्या वेदना आणि जखमांचे ओरखडे देखील पाहतो. जसे स्तोत्रकार घोषित करतो: **''हे यहोवा, मला पारख व माझा पडताळा पाहा; माझे अंतर्याम व माझे हृदय गाळून पाहा''** – स्तोत्र २६:२. आपली उद्दिष्टे आणि कृती नेहमीच एकमेकांशी जुळत नाहीत. जे आपल्याला योग्य व शुद्ध वाटते ते देवाच्या दृष्टीने पूर्णपणे वेगळे असू शकते, कारण प्रभू आत्मा गाळून पाहतो.

देवाचे वचन आपल्याला आठवण करून देते: **''प्रत्येकाला त्याच्या आचरणाप्रमाणे, त्याच्या कर्माच्या फळाप्रमाणे परत देण्यासाठी मी यहोवा हृदय शोधतो, मी अंतर्याम पारखतो''** – यिर्मया १७:१०. म्हणूनच आपल्या हृदयावर काय परिणाम होतो याबद्दल आपण सावधगिरी बाळगली पाहिजे.

पवित्र शास्त्र आपल्याला प्रेरित करते की, **''ज्या कशाचे तू रक्षण करतोस त्या सर्वांपेक्षा अधिक कसोशीने तू आपल्या हृदयाचे रक्षण कर,.....''** – नीतिसूत्रे ४:२३. त्याचप्रमाणे, नीतिसूत्रे २३:७ आपल्याला बोध करते की, **''तो आपल्या अंतर्यामी जसा विचार करीत असतो तसाच तो आहे; ....''**

प्रिय देवाच्या मुलांनो, आपल्या हृदयात काय प्रवेश करीत आहे याबाबत सावध आणि जागरूक राहा; मग ते सोशल मीडियाच्या माध्यमातून असो, तुम्ही वाचत असलेल्या पुस्तकांतून, तुम्ही पाहत असलेल्या चित्रपटांतून, किंवा मित्रांसोबतच्या संवादातून असो. प्रत्येक प्रभाव महत्त्वाचा असतो, कारण शेवटी तुमचे हृदयच तुमच्या जीवनाची दिशा ठरवते.

## २. आपल्या तोंडाचे रक्षण कर!

जेव्हा आपण ''तोंड'' म्हणतो, तेव्हा त्यात जीभही समाविष्ट असते आणि ती एक प्रभावी शस्त्र आहे. **''...जीभ ही लहान अवयव आहे, परंतु मोठ्या गोष्टींची फुशारकी मिरवते, पाहा, किती थोडकी आग केवढ्या मोठ्या रानाला पेटवते. आणि जीभ ही आग आहे; जीभ अन्यायाचे भुवन अशी आमच्या अवयवांमध्ये आहे; ती सगळ्या शरीराला मळवट, आणि स्वभावाच्या मार्गाला आग लावते.....''** – याकोब ३:५,६.

आपल्या तोंडातून बाहेर पडणारे शब्द एखाद्या व्यक्तीला उभारी देऊ शकतात किंवा मारक ठरू शकतात. म्हणूनच आपल्या शब्दांची ताकद समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अनेकदा आपण रागात बोलतो आणि नंतर स्वतःचे समर्थन करत म्हणतो, माझा तो अर्थ नव्हता. अनेकदा आपण ज्या लोकांवर सर्वांत जास्त प्रेम करतो त्यांनाच आपण गृहीत धरतो आणि आपला राग, नाराजी व नैराश्य आपण त्यांच्यावरच व्यक्त करतो. दुर्दैवाने, हे अनेकदा कठोर आणि दुखावणाऱ्या शब्दांतून व्यक्त होते.

आपण किती वेळा अशाप्रकारे आपला राग चुकीच्या पद्धतीने अशा व्यक्तीवर व्यक्त केला आहे जो प्रतिकार करण्यास सक्षम नाही?

### पवित्र शास्त्र आपल्याला चेतावणी देते:

**''जो आपले तोंड व आपली जीभ सांभाळतो, तो आपला जीव संकटांपासून सांभाळतो''** – नीतिसूत्रे २१:२३. स्तोत्रकर्त्याने एक सुंदर प्रार्थना देखील केली: **''हे यहोवा, माझ्या मुखावर पहारा ठेव, माझ्या ओठांचे दार राख''** – स्तोत्र १४१:३.

हीच आपली प्रार्थना असावी. आपल्या तोंडातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाबाबत आपण जागरूक राहावे.

## ३. आपला पाय सांभाळ!

**''....आपला पाय सांभाळ......''** – उपदेशक ५:१.

आपण उचललेले प्रत्येक पाऊल आपले भवितव्याला वळण लावते. म्हणूनच, आपण काळजीपूर्वक पाऊल टाकणे अत्यंत महत्त्वाचे आहे; आपण आपले पाय कुठे ठेवतो आणि कुठे जात आहोत याकडे बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे.

आपण कुठे जात आहोत आणि कोणत्या उद्देशासाठी जात आहोत याबाबत सतर्क असणे महत्त्वाचे आहे. अनेकदा, आपण आपल्या स्वतःच्या बलस्थानांना आणि कमकुवतपणांना गृहीत धरतो, हे लक्षात न घेता की, फक्त एक चुकीचे पाऊल आपल्याला देवाच्या इच्छेपासून खूप दूर नेऊ शकते. कधी कधी परत यायला वर्षेही लागू शकतात, ज्यामुळे आपला मौल्यवान वेळ वाया जातो आणि इतक्या




### अत्यंत महत्त्वाची सुचना!

नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते।

**आमचा पत्ता:**

एको ऑफ हीज कॉल
१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत
Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org

वर्षांमध्ये आपण देवाच्या आशीर्वादांपासून वंचित राहतो.

म्हणूनच, आपली योजना देवापुढे समर्पित करून ती त्याच्या इच्छेनुसार घडू देणे शहाणपणाचे आहे. नीतिसूत्रे १६:९ हे वचन आपल्याला आठवण करून देते की, **"मनुष्याचे हृदय त्याच्या मार्गाची योजना करते, पण यहोवा त्याची पावले चालवतो."** आपला देव हा अल्फा आणि ओमेगा आहे; तो भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ जाणतो. तो आपले यश आणि अपयश दोन्ही पाहतो. जेव्हा आपण सर्व काही त्याच्या हातात सोपवतो, तेव्हा आपण निश्चिंत राहू शकतो, कारण त्याच्या योजना नेहमीच चांगल्या असतात आणि तो आपल्यावर अतीव प्रेम करतो. त्याने आपल्यासाठी आपले जीवन दिले, तो मेला, मात्र पुन्हा जिवंत झाला आणि आता तो आपल्याला त्याच्या सार्वभौमत्वावर विश्वास ठेवण्यास बोलावतो.

आपली प्रार्थना अशी असावी: **"माझी पावले तुझ्या वचनात स्थापित कर, आणि कोणत्याही अन्यायाची सत्ता माझ्यावर चालू देऊ नको"** – स्तोत्र ११९:१३३. माझ्या सर्व तरुण मित्रांना, हीच आग्रहाची विनंती करतो की, तुमच्या तरुणपणी तुमचे मार्ग प्रभूला समर्पित करा. तुम्हाला याचा कधीही पश्चात्ताप होणार नाही.

## ४. लोभापासून आपणाला राख!

महत्त्वाकांक्षा आणि लोभ यांच्यामध्ये खूप बारीक रेषा आहे. महत्त्वाकांक्षी असणे चांगले आहे, पण लोभ नाश करतो. येशू स्वतः चेतावणी देतो, **"तुम्ही सावध असा, आणि सर्व प्रकारच्या लोभापासून आपणांला राखा"** – लूक १२:१५.

ऑक्सफर्ड शब्दकोशामध्ये लोभाची व्याख्या "एखाद्या व्यक्तीच्या गरजेपेक्षा जास्त संपत्ती किंवा शक्तीची अतिरेकी इच्छा किंवा आवश्यकतेपेक्षा जास्त अन्न किंवा पेयाची तीव्र इच्छा" अशी केली आहे. अतिरेकी, तीव्र इच्छा आणि आवश्यकतेपेक्षा जास्त या शब्दांकडे लक्ष द्या. याच गोष्टी लोभाला महत्त्वाकांक्षेपेक्षा वेगळे ठरवतात.

पवित्र शास्त्र आपल्याला समाधान मानायला शिकवते, जे लोभीपणाच्या किंवा सतत अधिकची इच्छा बाळगण्याच्या अगदी विरुद्ध आहे. **"तुमची वर्तणूक द्रव्याच्या लोभावाचून असावी; तुमच्याजवळ असतील तेवढ्या वस्तूंनी तुम्ही तृप्त असावे; कारण त्याने असे म्हटले आहे की, मी तुला सोडणारच नाही व तुला टाकणारच नाही"** – इब्री १३:५.

आपल्याकडे सर्व काही मुबलक आहे यावर आपले समाधान अवलंबून नसते. उलट, ते अशा देवाला जाणून घेण्यामुळे येते, ज्याच्या हातात संपूर्ण जग आणि त्यातील सर्व संपत्ती आहे. प्रत्येक परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याची आणि सर्व गोष्टी आपल्या भल्यासाठी करण्याची शक्ती त्याच्याकडे आहे. मी तुला सोडणार नाही आणि टाकणारही नाही असे अभिवचन त्याने आपल्याला दिलेले आहे. तो आपल्याला कधीही अर्ध्यावर सोडणार नाही, तर विश्वासयोग्य राहून आपल्याला शेवटापर्यंत नेईल, आणि म्हणूनच आपण त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवू शकतो.

आपल्या पापाच्या आणि शापाच्या बंधनातून सोडविण्याकरिता देवाने जर त्याच्या एकुलत्या एका पुत्राला आपल्याकडे राखून न ठेवता तुम्हा-आम्हांकरिता दिला, तर तो आपल्या जीवनातील प्रत्येक गरजा पूर्ण करणार नाही का? **"ज्याने आपल्या पुत्राला देखील राखून ठेवले नाही, तर आपणां सर्वांकरिता त्याला देऊन टाकले, तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्व गोष्टी कशा देणार नाही?"** – रोम ८:३२.

प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, धीर धरा: तो यहोवा-यिरे आहे – आपला पुरवठा करणारा देव. तो त्याच्या संपत्त्यनुरुप आपल्या सर्व गरजा त्याच्या गौरवामध्ये पूर्ण करण्यास सर्वसमर्थ आहे. त्याच्यावर विसंबून राहा, त्याच्यावर विश्वास ठेवा, आणि तो तुम्हाला आपल्या स्वर्गीय विपुलतेने आशीर्वाद देईल.

आपण स्वतःला ज्या सर्वात मोठ्या धोक्यांपासून स्वतःचे रक्षण केले पाहिजे ते म्हणजे पैशाचे प्रेम; **"कारण द्रव्याचा लोभ सर्व प्रकारच्या वाईटाचे मूळ आहे;....."** – १ तीमथ्य ६:१०. पवित्र वचन आपल्याला आठवण करून देते की, **"ज्याला रूपे आवडते तो रुप्याने, आणि ज्याला विपुल धन आवडते तो संपत्तीने तृप्त होणार नाही...."** – उपदेशक ५:१०. संपत्तीवर केंद्रित असलेले हृदय कधीही खरे समाधान अनुभवणार नाही.

कृपया समजून घ्या – पैसा ही समस्या नाही. आपल्याला जगण्यासाठी, कष्ट करण्यासाठी आणि आपल्या कुटुंबाची काळजी घेण्यासाठी पैशाची गरज आहे. पण जेव्हा पैशाच्या मागे लागण्यामुळे आपल्याला आध्यात्मिक जीवनाची, आपल्या कुटुंबाची किंवा देवाच्या राज्याप्रती असलेल्या आपल्या वचनबद्धतेची किंमत मोजावी लागते तेव्हा ते आपल्यासाठी धोकादायक ठरते. जर एखाद्या नोकरीसाठी तुम्हाला देवासोबतच्या वेळेचा त्याग करावा लागतो, सहभागितेपासून वंचित राहावे लागते किंवा त्याच्यासोबतच्या तुमच्या वाटचालीत तडजोड करावी लागते, तर मग प्रार्थनापूर्वक त्या नोकरीचे पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे.

## ५. जे तुझ्या स्वाधीन केले आहे ते सांभाळ!

**"हे तीमथ्य, जी तुझ्या स्वाधीन केलेली ठेव ती सांभाळ"** – १ तीमथ्य ६:२०.

देवाने ज्या गोष्टी तुमच्या स्वाधीन केलेल्या आहेत त्यांच्याबद्दल विचार करा. बाहेरील प्रभावापासून त्यांचे रक्षण करण्यास सावध असा. ती ठेव तुमचे कुटुंब, तुमचे काम, तुमची आर्थिक स्थिती, तुमचे आव्हान, तुमचा अभिषेक, किंवा तुमची सेवा असू शकते, त्यांचे रक्षण आपल्या जीवापर्यंत करा!

आपण त्या दासासारखे होऊ नका, ज्याने त्याच्याकडे एकच असलेली मोहर लपवली. देवाची इच्छा आहे की, त्याने आपल्या हातात जे दिले आहे ते आपण वाढवावे. तुमच्याकडे जे आहे ते जपा आणि त्याचा विश्वासाने उपयोग करा. त्याच वेळी देवाने तुम्हाला सोपविलेले जे काही आहे ते दुसऱ्यांपर्यंत पोहोचवणे देखील महत्त्वाचे आहे. वचन सांगते: **"......त्या गोष्टी जे दुसऱ्यांसही शिकवायला समर्थ होतील अशा विश्वासू माणसांना सोपवून दे"** – २ तीमथ्य २:२.

प्रिय मित्रांनो, देवाने आपल्याला आपल्या मुलांना, पुढील पिढीला, आणि आपल्या सभोवतालच्या लोकांना शिकवण्यासाठी पाचारण केले आहे. निरंतर गौरव केला जाईल असा वारसा मागे सोडा.

## ६. आपली चालचलणूक सांभाळ म्हणजे शेवट चांगला होईल आणि तुला प्रतिफळ मिळेल!

अनेक लोक खूप चांगल्या रीतीने सुरुवात करतात, पण मार्गात कुठेतरी त्यांचे लक्ष विचलित होते. सातत्य हे शेवट

(...पान ७ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ ऑक्टोबर, २०२५ पासून ते १८ नोव्हेंबर, २०२५

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ ऑक्टोबर** - जगभर पवित्र शास्त्र व ख्रिस्ती साहित्य छापण्याच्या कार्यात सहभागी असलेल्यांच्या गरजा पूर्ण होत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२० ऑक्टोबर** - आमचे सहाय्यक संपादक व त्यांचे मदतनीस यांच्या संरक्षणासाठी देवाची स्तुती करा.

**२१ ऑक्टोबर** - आमचे वरिष्ठ पास्टर विविध सेवाकार्याद्वारे सुवार्ता पसरविण्याच्या बांधिलकीने कार्यरत आहेत यासाठी देवाची स्तुती करा.

**२२ ऑक्टोबर** - जेणेकरून आपण इतर सेवाकार्यांना सुद्धा सहाय्य पाठवू शकू यासाठी देवाची स्तुती करा.

**२३ ऑक्टोबर** - आमच्या सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबियांना दिलेल्या आशीर्वादांबद्दल देवाची स्तुती करा.

**२४ ऑक्टोबर** - **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन शाळेतील** आमच्या संडे स्कुलच्या लहान मुलांच्या कार्यक्रमात नवीन विद्यार्थी सामील झाले यासाठी देवाची स्तुती करा.

**२५ ऑक्टोबर** - आमच्या **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्स** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्सच्या** वाढीसाठी देवाची स्तुती करा.

**२६ ऑक्टोबर** - आमच्या समर्थकांच्या पाठींब्याबद्दल आणि सेवाकार्यात ते भाग घेत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२७ ऑक्टोबर** - आमच्या प्रार्थनेमध्ये सहभागीदार असलेले, तसेच सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाने केलेल्या दयेबद्दल देवाची स्तुती करा.

**२८ ऑक्टोबर** - **नहेम्या बायबल कॉलेजच्या** सुरळीत कार्यासाठी देवाच्या दयेबद्दल कृतज्ञतेसह देवाची स्तुती करा.

**२९ ऑक्टोबर** - आमच्या मुख्य मंडळी मधील युवक सेवाकार्याची वाढ होत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**३० ऑक्टोबर** - आमच्या मिशनर्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**३१ ऑक्टोबर** - आमच्या मुख्य मंडळी मधील बंधूंच्या सभेला देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**०१ नोव्हेंबर** - मागील महिन्यात आमच्या सर्व आर्थिक आणि आध्यात्मिक गरजा देवाने पूर्ण केल्याबद्दल कृतज्ञतेसह देवाची स्तुती करा.

**०२ नोव्हेंबर** - आमच्या सुवार्ता छपाई यंत्राच्या सातत्यपूर्ण कार्यासाठी आणि त्यातील कामगारांच्या समर्पणासाठी देवाची स्तुती करा.

**०३ नोव्हेंबर** - आमच्या सर्व प्रकारच्या सेवाकार्यात देव आमचे मार्गदर्शन करीत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ नोव्हेंबर** - आमच्या निवासी आणि संध्याकाळी होणाऱ्या **नहेम्या बायबल कॉलेजमधील** विद्यार्थ्यांच्या शिष्टाचारासाठी आणि समर्पणासाठी कृपया प्रार्थना करा.

**०५ नोव्हेंबर** - सर्व राष्ट्रांमध्ये ऐक्य आणि शांतीसाठी कृपया प्रार्थना करा.

**०६ नोव्हेंबर** - आमची मुख्य मंडळी आणि त्यांच्या शाखांतील **''एको ऑफ हिज कॉल''** च्या विश्वासू आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी कृपया प्रार्थना करा.

**०७ नोव्हेंबर** - मुले आणि युवकांना मादक द्रव्यांच्या सापळ्यातून संरक्षण मिळावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०८ नोव्हेंबर** - आमचे सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्यासाठी व सुरक्षिततेसाठी कृपया प्रार्थना करा.

**०९ नोव्हेंबर** - जगभर बाल तस्करी संपुष्टात यावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१० नोव्हेंबर** - सर्व ख्रिस्ती सेवाकार्यामध्ये सामर्थ्यवान चमत्कार, आश्चर्य आणि चिन्हे भरपूर प्रमाणात घडावीत यासाठी कृपया प्रार्थना करा.

**११ नोव्हेंबर** - आमचे सहभागीदार, राज्य समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबांसाठी कृपया प्रार्थना करा.

**१२ नोव्हेंबर** - जगाच्या अनेक भागांवर परिणाम करणाऱ्या आर्थिक मंदीमधून मुक्तता मिळावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१३ नोव्हेंबर** - पृथ्वीवर त्याचे राज्य निर्माण व्हावे म्हणून स्पष्ट दृष्टीकोन तयार होण्यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१४ नोव्हेंबर** - कमी संधी असलेल्या आणि उपेक्षित समुदायांच्या आर्थिक उन्नतीसाठी कृपया प्रार्थना करा.

**१५ नोव्हेंबर** - जगभरातल्या मिशनर्यांना परमेश्वराचे दैवी संरक्षण मिळावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१६ नोव्हेंबर** - देवाचे भय मानणाऱ्या नेत्यांनी प्रत्येक राष्ट्रांचे नेतृत्व करावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१७ नोव्हेंबर** - जसे की पगार, छपाई साहित्य, टपाल खर्च, आणि वाहतूक या सेवाकार्याशी संबंधित असलेल्या आर्थिक गरजा पूर्ण व्हाव्या म्हणून कृपया प्रार्थना करा.

**१८ नोव्हेंबर** - सर्व विश्वासणाऱ्यांच्या हृदयांचे ज्ञानप्रकाश होण्यासाठी कृपया प्रार्थना करा.

# विशेष कार्यक्रम !

## यशोवंतांचा गौरव पुरस्कार!

आमचे सहकारी सिस्टर नागज्योती (आय पी एस ), माननीय न्यायमूर्ती अग्नेस आणि सिस्टर सी. मेरी मॅग्डालीन यांना २७ एप्रिल २०२५ रोजी यशोवंतांचा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात व सेवाकार्यात दाखविलेल्या निष्ठा, परिश्रम आणि उल्लेखनीय यशाच्या मान्यतेस्वरूप हा सन्मान करण्यात आला. हे पुरस्कार **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्री** द्वारे देण्यात आले.

## सेवाकार्यातील मानद डॉक्टरेट पुरस्कार!



ज्येष्ठ वकील एन बालाजी, रेव्ह. एम. मोथिस विनोद आणि सिस्टर न्जेलिना सेल्वाकुमारी यांना सेवाकार्यातील मानद डॉक्टरेट पुरस्कार देण्यात आला.

सेवाकार्यातील मानद डॉक्टरेट पुरस्कार हे ज्येष्ठ वकील एन. बालाजी, रेव्ह. मोथिस विनोथ आणि सिस्टर अँजेलिन सेल्वाकुमारी हेन्री यांना १० ऑगस्ट २०२५ रोजी प्रदान करण्यात आले. हे पुरस्कार त्यांच्या प्रामाणिकपणा, विश्वासूपणा आणि **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीद्वारे** देवाच्या कार्यातील समर्पित सेवेला मान्यता देणारे आहेत.

## एको ऑफ हिज कॉल सेवाकार्याचा ५७ वा वर्धापनदिन!

**एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीच्या** ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष सभांचे



रेव्ह. डॉ. स्टीफन देवकुमार आणि रेव्ह. डॉ. जे. डी. चार्ल्स- प्रमुख वक्ते.

आयोजन १० ऑगस्ट २०२५ रोजी आमच्या मुख्य मंडळीमध्ये करण्यात आले. रेव्ह. डॉ. स्टीफन देवकुमार आणि रेव्ह. डॉ. जे. डी. चार्ल्स हे प्रमुख वक्ते होते. देवाच्या नावाची महिमा हे या सभांचे वैशिष्ट्य होते.

## मुलांचे समर्पण!

भाऊ मोहन आणि सिस्टर रेचेल यांचा मुलगा याबेस जीवन आणि भाऊ सिम्सन व सिस्टर एस्तेर यांचा मुलगा बेनेटिक यांच्या बाल समर्पणासाठी सेवा पार पडली.



भाऊ मोहन आणि बहीण रेचल यांचा पुत्र याबेस जीवन.



भाऊ सिमसन आणि बहीण एस्तेर यांचा पुत्र बेनेटिक.

## डिप्लोमा इन थिओलॉजी आणि बॅचलर इन थिओलॉजी कोर्सेस!

चेपॉक आणि संतोषपूरम येथील **नहेम्या बायबल कॉलेजमध्ये** अनुक्रमे डिप्लोमा इन थिओलॉजी आणि बॅचलर इन थिओलॉजी कोर्सेसचे उद्घाटन करण्यात आले, जे विद्यार्थ्यांना प्रभावी सेवाकार्यासाठी सक्षम व सशक्त करण्यासाठी आहेत.



चेपॉक येथील नहेम्या बायबल कॉलेजचे विद्यार्थी.



संतोषपुरम येथील नहेम्या बायबल कॉलेजचे विद्यार्थी.

ECHO OF HIS CALL REACHING NATIONS SINCE 1959

नहेम्या बायबल कॉलेजेस

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई

प्रवेशासाठी त्वरा करा !

ईश्वरविद्या डिप्लोमा &
Bachelor of Theology

माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. Branch Churches: Santhoshapuram, Balaji Nagar & Velachery
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२०. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२१. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

(पान ४ वरुन)

विजयी करण्याची गुरुकिल्ली आहे. मग ते पवित्र शास्त्र वाचन असो, प्रार्थना करणे असो, सेवाकार्य असो किंवा चांगली कृत्ये करणे असो, प्रतिदिन विश्वासूपणा महत्वाचा असतो.

अलीकडे माझी एका तरुणाशी भेट झाली. त्याने मला सांगितले की, त्याला ख्रिस्तासोबत चालण्यास आवडते, पण त्यात समतोल राखण्यात तो संघर्ष करीत आहे. काही दिवस तो स्वतःला देवाच्या जवळ असल्याचे इतकं अनुभवतो की, तो तासन्तास त्याच्या उपस्थितीत घालवतो, जसे की, पवित्र शास्त्र वाचणे, प्रार्थना करणे, उपासना करणे, तसेच सुवार्तेची गाणी व संदेश ऐकणे. तरीही इतर दिवशी, त्याचा मूड इतका खराब असतो की, त्याला पवित्र शास्त्र उघडण्याची किंवा त्याबद्दल विचार करण्याची इच्छाच होत नाही. त्याने मला विचारले की, हा संघर्ष कसा हाताळायचा.

कदाचित तुमच्यापैकी काही जणांनाही असेच वाटत असेल. मी त्याला सांगितले की, हा एक सापळा आहे आणि त्यात तू अडकून राहू नकोस. यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, उद्धेश्यपूर्ण निर्णयाने पुढे चालत राहणे, विश्वासू राहणे आणि भावना काहीही असोत तरी पुढे वाटचाल करीत राहणे.

कधी कधी तुला जाणूनबुजून कृती करावी लागेल, कारण तसे करावेसे वाटते म्हणून नव्हे, तर ते आवश्यक आहे म्हणून. कधी कधी असं वाटू शकतं की, आपण फक्त दिखावा करीत आहोत, पण प्रत्यक्षात आपण त्याचा सराव करीत आहोत. सातत्य राखण्यासाठी शिस्त आवश्यक आहे, आणि

(पान ९ वर)

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

**Account Name : ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST**
**Account Number : 1023 2923 805**
**Bank Name : STATE BANK OF INDIA**
**Branch : TRIPLICANE, CHENNAI - 600 005**
**IFSC Code : SBIN 0000249**
**SWIFT Code : SBI NIN BB 455**



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**
**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# देव दुर्बळांच्या प्रार्थनेचे उत्तर देतो!



देवाच्या कृपेने, १०-०८-१९६९ पासून मी माझी सुवार्तेची सेवा सुरू केली. या सेवेमध्ये मी सेवकाईचे प्रशिक्षण घेतले, सुवार्ता पत्रके वाटली, प्रार्थना सभांचे नेतृत्व केले आणि मंडळीमध्ये देवाच्या वचनाचा प्रचार केला.

मी तरुण आणि या सेवेत नवा असल्यामुळे देवाचा सेवक म्हणून मला जवळजवळ कुणीही ओळखत नव्हते. याशिवाय, सेवाकार्य पुढे सुरू ठेवण्यासाठी आर्थिक अडचण माझ्यासाठी मोठा अडसर ठरला. त्यामुळे मला दररोज अनेक मैल पायी चालावे लागायचे आणि तरीही माझी सेवा चालू ठेवावी लागायची. म्हणून लांब पायी चालणे आणि उपासमारी ही माझ्या सेवाकार्याचा अविभाज्य भाग होती. सेवाकार्य करण्यासाठी आणि सेवेसाठी आवश्यक साधनसामग्री खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक गरज होती.


माझ्या सेवाकार्याच्या सुरुवातीपासूनच माझा ठाम निश्चय होता की, माझ्या कोणत्याही मित्रांकडून किंवा नातेवाईकांकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची मागणी करायची नाही. कारण देवानेच मला बोलावले आहे, म्हणून त्याचे कार्य करण्यासाठी आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता देखील देवानेच करायची आहे. आजपर्यंत या तत्त्वाशी प्रामाणिक राहण्यासाठी देवानेच मला मदत केली आहे. या तत्त्वाचा अवलंब केल्यामुळे मला वर्णन न करता येणाऱ्या अडचणी व आव्हानांना सामोरे जावे लागले.



मी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या इतका थकून गेलो होतो की, एका विशिष्ट परिस्थितीत मी सामना करू शकत नव्हतो. माझ्या नातेवाइकांपैकी श्री. स्वर्णराज यांनी मला परिवहन विभागात सरकारी नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला; तसेच पलपलम, मथिकोडे येथील देवाचे सेवक बंधू कॉलिन्स आणि माझा एक मित्र यांनी मला एका खासगी कंपनीत नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांचे दोघांचेही प्रयत्न निष्फळ ठरले.

अशा परिस्थितीत, मी १७.०५.१९७१ रोजी उपवास करीत असताना, प्रभूच्या आत्म्याने मला कायमस्वरूपी नोकरीसाठी प्रार्थना करण्यास प्रवृत्त केले. त्या प्रार्थनेच्या परिणामस्वरूप मला या शब्दांच्याद्वारे ठाम खात्री मिळाली की, ''एका महिन्याच्या आत मी तुला कायमस्वरूपी नोकरी देईन आणि त्यावर तू आपला उदरनिर्वाह करू शकशील.'' पवित्र वचनानुसार, ''**आणि त्याच्याजवळ जे धैर्य आपल्याला आहे की, जर आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकतो. आणि जे काही आपण मागतो त्याविषयी तो आपले ऐकतो हे आपल्याला ठाऊक आहे तर जी मागणी आपण त्याच्याजवळ मागितली आहेत ती आपल्याला मिळाली आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे**'' - १ योहान ५:१४,१५. मला नवीन नोकरी मिळाली आहे असे वाटून मी त्यात सामील होण्यासाठी शक्य तितकी तयारी केली. माझी कार्ये पाहून अनेकांनी माझ्या मानसिक स्थितीबद्दल शंका घ्यायला सुरुवात केली. पण त्यांच्या विचारांची पर्वा न करता, मी देवावर पूर्ण विश्वास ठेवला.

दिवस जात होते तसे मी दररोज पोस्टमन येण्याची आतुरतेने वाट पाहत होतो. संपूर्ण महिना उलटल्यानंतर, नेमके १८-०६-१९७१ रोजी प्रभूवरील विश्वासाच्या सहाय्याने मी पोस्ट कार्यालयात गेलो. जसे पोस्टवाले श्री नेल्लैयप्पन यांनी मला पाहिले, त्यांनी संकेत दिला की,





माझ्यासाठी काहीच आलेले नाही. तरीही देवाच्या वचनांना चिकटून राहून तिथेच बसलो आणि प्रार्थना करीत राहिलो. माझ्या आश्चर्याची बाब म्हणजे, काही मिनिटांतच तोच पोस्टमन मला म्हणाला, सॅम, तुझ्यासाठी एक नोंदणीकृत पत्र आलेले आहे, त्यावर सही करून घे.

पत्र उघडल्यावर मला आढळले की, ते **तामिळनाडू लोकसेवा आयोग कार्यालय,** चेन्नई यांजकडून कामगार विभागात सामील







*श्री ए. शेनबगम बि.ई., मुख्य कारखाना निरीक्षक यांच्या वतीने, माझ्या सहकाऱ्यांसह, मी १९९४ साली शासकीय नोकरी सोडत असताना आयोजित निरोप समारंभ.*



*मी १९९४ साली शासकीय नोकरी सोडली तेव्हा माझे सहकारी.*

होण्यासाठी नियुक्ती पत्र होते. काही वर्षांपूर्वी घेतलेल्या माझ्या परीक्षेचा तो निकाल होता. हे माझ्या कळकळीच्या प्रार्थनेने वेगात झाले आणि एक चमत्कार घडला. होय, प्रार्थना हे एक अद्भुत आध्यात्मिक अस्त्र आहे.

मी आनंदाने चेन्नईला आलो आणि कामावर रुजू झालो. नोकरीतील माझ्या पगाराचा मोठा भाग मी माझ्या सेवाकार्यामध्ये गुंतवला. देवाच्या कृपेमुळे आणि लोकांच्या साहाय्यामुळे, सरकारी नोकरी करीत असतांना सुद्धा सरकारने माझ्या सेवाकार्याला विशेष परवानगी दिली. नंतर, १९९४ मध्ये, प्रभूने मला पूर्णवेळ सेवेसाठी सरकारी नोकरी सोडण्याचे आदेश दिले आणि मी त्याच्या पाचारणाचे पालन करून पूर्णवेळ सेवेत रुजू झालो.

आपला देव चांगला आहे! तो त्याच्या वेळेचं पालन करणारा आहे! त्याला घट्ट चिकटून राहा!! तुम्हाला यश मिळेल!!! आज तो तुमच्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

"**स्थिर मनाला तू पूर्ण शांतीत राखशील, कारण ते तुझ्यावर भाव ठेवते**" - यशया २६:३.

*************

(पान ७ वरून)
शिस्त ही जाणीवपूर्वक पाळली गेली पाहिजे; अन्यथा आपण ध्येयापासून दूर जाऊ.

म्हणूनच, पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की, आपण जे काही सुरू करतो, ते पूर्णही करावे, कारण फक्त तेव्हाच आपण आपल्या प्रयत्नांचे फळ, म्हणजेच आपले वेतन प्राप्त करू शकतो. "**जे आम्ही केले ते तुम्ही गमावू नये, तर तुम्हाला पूर्ण वेतन मिळावे म्हणून तुम्ही आपणांस जपा**" - २ योहान १:८.

देव आपल्याला विश्वासपूर्वक धाव पूर्ण करण्यास सामर्थ्य देवो. तो आपल्याला त्याने बोलावलेले कार्य पूर्ण करण्यास समर्थ करील, जेणेकरून तो जेव्हा तुतारीच्या निनादासह परत येईल तेव्हा आपण आपले प्रतिफळ प्राप्त करू!

## ७. देवाच्या वचनाला विरोध करणाऱ्यांपासून सावध राहा!

शेवटी, शास्त्र आपल्याला शिकवते की, देवाच्या राज्याला विरोध करणाऱ्यांपासून स्वतःचे रक्षण करावे. पौल तिमथ्याला इशारा देतो: "**त्याच्याविषयी तूही जपून राहा कारण तो आमच्या बोलण्यास फार आडवा आला होता**" -२ तीमथ्य ४:१५.

कारण, नियमितपणे, पवित्र शास्त्र आपल्याला सर्वांवर प्रेम करायला आणि संयमी राहायला शिकवते, "**शक्य तर सर्व माणसांबरोबर तुम्हांकडून होईल तितके शांतीने राहा**" - रोम १२:१८, - आपण मंडळीमध्ये आणि समाजामध्ये, ख्रिस्ताच्या देहाच्या ऐक्याला कमकुवत करणाऱ्यांना सहन करीत बसतो. तरीसुद्धा येथे आपण पाहतो की, देवाच्या वचनाविरुद्ध आणि देवाच्या कार्याविरुद्ध काम करणाऱ्यांना पौल ठामपणे ताकीद देतो.

तो आपल्यालाही शिकवतो की, खोट्या शिकवणीविरुद्ध स्वतःचे रक्षण करावे, जागरूक राहावे आणि सतर्क राहावे. जसे पवित्र शास्त्राने आधीच इशारा दिलेला आहे, या शेवटच्या दिवसांत, अनेक शिक्षण सत्य जाहीर करण्यासाठी नव्हे, तर लोकांचे मन आणि इच्छा तृप्त करण्यासाठी मांडल्या जात आहेत. उपदेशक बहुधा आपल्या मंडळीचा अपमान होईल या भीतीने सत्य सांगणे टाळतात. परिणामी, प्रत्येक स्तरावर तडजोडी दिसून येतात.

पेत्राने जेव्हा जाहीरपणे सांगितले तेव्हा त्याच्या धाडसाचे मला नेहमीच आश्चर्य वाटते, "**आम्ही मनुष्यांपेक्षा देवाची आज्ञा मानली पाहिजे**" - प्रेषित ५:२९. प्रश्न हा आहे की, आज किती ख्रिस्ती नेते आणि विश्वासी असे विधान करण्यास तयार आहेत? आपल्यामध्ये सर्व अडचणींना सामोरे जाण्याचे धैर्य आहे का? आपण धाडसाने असे सांगू शकतो का, मी या व्यक्तीला किंवा या निर्णयाला स्वीकारणार नाही, कारण तो देवाच्या वचनाविरुद्ध आहे?

याच संदर्भात देव आपल्याला या शेवटच्या दिवसांत स्वतःचे रक्षण करण्यासाठी बोलावतो.

प्रिय मित्रांनो, आपण अशा सात मुद्द्यांवर विचार केला आहे, ज्याद्वारे पवित्र शास्त्र आपल्याला आपल्या जीवनाचे रक्षण करण्याचे निर्देश देते. माझी प्रार्थना हीच आहे की, देव आपल्याला शहाणपण आणि धैर्य देवो, जेणेकरून आपण स्वतःचे रक्षण करू शकू आणि त्याच्या वचनावर दृढ उभे राहू शकू, कारण त्याच्या पुन्हा येण्याचा समय खूपच जवळ आलेला आहे.

देव आपण सर्वांस आशीर्वादित करो!

********

### सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

– संपादक

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
*Please subscribe*

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.
- Editor

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | ICIC 000 6038 |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 13th OCTOBER 2025.
If un-delivered please return to:
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**